दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक –६० शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue- 60 Saturday ७ November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

खरच बीड जिल्हा अजब आहे : जिल्ह्यामध्ये सारं काही गजब आहे...!

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्था

'जगा कही और निशाणा कही पे'....?

अंबाजोगाई / सुनील सीरसाट

अंबाजोगाई पासून केवळ पंधरा (15) किमी अंतरावर असणाऱ्या घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्थेच्या इमारतीसाठी दान जागा घेतली एक आणि संस्था बांधली दुसऱ्याच ठिकाणी असा आरोप करत विठ्ठल तुकाराम जाधव यांनी शासन दरबारी आणि मा. न्यायालयात दाद मागितली असल्याने शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. यामुळे बीड जिल्हा परत एकदा चर्चेत आला असून खरंच बीड जिल्हा अजब आहे येथे घडणारे सारकाही गजब आहे असंच काहीसं आता बीड जिल्ह्याच्या बाबतीत चित्र होऊन बसले आहे.

घाटनांदुर येथील सोमेश्वर शिक्षण संस्थेने बेकायदेशीर रित्या सरकारी गायरानात शाळेच्या इमारतीचे प्रत्यक्ष बांधकाम केले असून, या संस्थेला ज्या गटामध्ये विठ्ठल जाधव यांनी जमीन दान दिली होती. त्या गटात इमारत न बांधता इमारत त्याच गटात आहे असे दर्शवून लाखो रुपयांचे अनुदान आजपर्यंत उचलण्याचे काम या शिक्षण संस्थेने केले असून आजतागायत बोगस जागेत इमारत करून दुसऱ्याच बोगस जागेत इमारत असल्याचे दाखवून शासनाला लाखो रुपयांना चुना लावणाऱ्या या संस्थेचे भिंग फोडण्याचे काम तक्रारदार विठ्ठल जाधव यांनी शासन दरबारी विविध कार्यालयात तक्रार अर्ज दाखल करून केले आहे. परंतु बीड जिल्ह्याच्या बाबतीत आता एक नवीनच पायंडा अलीकडच्या काळात पडला असून, तो मोडून काढण्याचे काम कुठलाही अधिकारी करण्याच्या मानसिकतेत दिसून येत नाही. बीड जिल्ह्यात अगदी कसब पणाला लावून तुम्ही कोणत्याही सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार उघडा केला. त्या संबंधित अगदी ठोस पुरावे जरीकरिता दिले. तरीही कारवाई मात्र शून्य होते. नेमके या अधिकाऱ्यांचे हात खूप लांब आहेत की, शासनाला केवळ भंपकबाजी करून लोकांना मूर्खात काढायचा आहे आणि कुठल्याच प्रकरणाचा छडा लावायचा नाही...? हे कळायला मार्गच नाही. ज्येष्ठ नागरिक असलेले निराधार तक्रारदार विठ्ठल जाधव यांचा आत्मविश्वास पाहून तरी मायबाप शासनाला त्यांच्या वयाची आणि त्यांच्या हिमतीला दाद देता येईल का...? अगदी उतरत्या वयात त्यांनी बीड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एक संस्था तथा संस्था चालक व त्यांचे सहकारी शासनाच्या करोडो रुपयांना चुना लावून उघडपणे मोठा भ्रष्टाचार करत असताना आणि आपले हातपाय आणि शरीर दिवसेंदिवस थकत चाललेले असताना सुद्धा देशाच्या संविधानाशी बांधिल राहून अंबाजोगाई-बीड-छत्रपती संभाजीनगर मार्गे मुंबईच्या फेऱ्या मारणाऱ्या विठ्ठल जाधव यांची मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांना, शिवाय बीड जिल्ह्याचे सीईओ, जिल्हाधिकारी यांना तक्रारदारांच वय पाहता तरी आपणही कधीतरी त्या वयात जाणार आहोत. आपले आई-वडील सुद्धा म्हातारे आहेत. अर्थात आपल्या घरात आणि आजूबाजूला हजारो जेष्ठ नागरिक आहेत. याचे भान राखून तरी विठ्ठल जाधव यांना न्याय मिळेल का नाही याकडे जाता संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.



परळी मार्ग नांदेड-हडपसर दरम्यान धावणार विशेष रेल्वेगाडी

परळी / प्रतिनिधी

दिवाळी सणाच्या निमित्ताने प्रवाशांची होणारी मोठी गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांना मोठा दिलासा दिला आहे. सणासुदीच्या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी नांदेड–हडपसर–नांदेड दरम्यान एक विशेष रेल्वेगाडी चालवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. या गाडीमुळे मराठवाड्यातून पुण्याकडे (हडपसर) जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांना अतिरिक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

नांदेड ते हडपसर (गाडी क्र. ०७६०७): ही विशेष रेल्वेगाडी शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६:५० वाजता नांदेड स्थानकावरून रवाना होईल. ही गाडी पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, हरंगुळ, औसा रोड, मुरुड, ढोकी, येडशी, धाराशिव, पांगरी, बार्शी, शेंद्री, कुर्डूवाडी, केम, जेऊर, कित्तूर, भिगवण आणि दौंड या मार्गे प्रवास करत त्याच दिवशी रात्री १०:०५ (२२:०५) वाजता हडपसर येथे पोहोचेल. (एक फेरी) हडपसर ते नांदेड (गाडी क्र. ०७६०८): परतीच्या प्रवासासाठी ही गाडी शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११:४० (२३:४०) वाजता हडपसर येथून सुटेल. ही गाडी आल्या मार्गानेच परतीचा प्रवास करेल आणि दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २:०० वाजता नांदेड येथे पोहोचेल.

प्रवाशांच्या सोयीसाठी या विशेष रेल्वेगाडीला एकूण २० डबे जोडण्यात आले आहेत. यामध्ये प्रथम श्रेणी वातानुकूलित (First AC), द्वितीय श्रेणी वातानुकूलित (Second AC), सामान्य श्रेणी वातानुकूलित शयनयान आणि सर्वसाधारण डब्यांचा समावेश असेल.

त्यामुळे सर्व स्तरातील प्रवाशांना यातून प्रवास करता येईल. दिवाळीच्या काळात प्रवाशांची होणारी वाढती गर्दी पाहता ही विशेष गाडी म्हणजे प्रवाशांसाठी एक मोठी पर्वणी आहे. जास्तीत जास्त प्रवाशांनी या विशेष रेल्वे सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आदिम जमाती व पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी,१६० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज

कातकरी, कोलाम व माडिया जमातींसाठी १३० कोटी, पारधी समाजासाठी ३० कोटी

मुंबई प्रतिनिधी

राज्य शासनाने 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत कातकरी, कोलाम व माडिया या आदिम जमातींसह पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात १६० कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची तरतूद केली आहे. यापैकी आदिम जमातींसाठी १३० कोटी रुपये, तर पारधी समाजासाठी ३० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या योजनांसाठी १०० टक्के शासकीय अनुदान देण्याची तरतूद या पॅकेजमध्ये करण्यात आली आहे.

आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून या पॅकेजची अंमलबजावणी सुरू केली आहे. आदिम जमाती पॅकेजमधील १३० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी, तर ३० कोटी रुपये वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या



योजनांसाठी वापरण्यात येणार आहेत. पारधी समाजासाठीच्या ३० कोटी रुपयांपैकी १० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी आणि २० कोटी रुपये वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजनांसाठी उपलब्ध असतील.

वैयक्तिक व सामूहिक योजनांना १०० टक्के शासकीय अनुदान

या पॅकेजनुसार वैयक्तिक योजनेसाठी कमाल ५० हजार रुपये, तर दोन किंवा अधिक लाभार्थ्यांच्या सामूहिक योजनेसाठी कमाल ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत शासकीय अनुदान देण्यात येणार आहे. अन्य विभागांच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांना स्वहिस्सा भरणे शक्य नसल्यामुळे ते लाभापासून वंचित राहत असल्यास, हा हिस्साही आदिवासी विकास विभाग या पॅकेजमधून उपलब्ध करून देणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी अधिकाधिक महिला बचत गटांच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

महिलांनी सामूहिक उपक्रम हाती घेऊन कुटुंबाचे आर्थिक सक्षमीकरण करावे, यासाठी गटांना ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. आवश्यक स्वहिस्सा भरण्यासाठीही पॅकेजमधून मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

या पॅकेजमधील निधीच्या माध्यमातून आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, नरेगा जॉब कार्ड, आयुष्मान कार्ड आणि बँक खाते यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय, जनजागृती आणि विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. आरोग्य तपासणी शिबिरे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि परिचारिकांच्या भेटी, आरोग्य शिक्षण तसेच शासकीय आरोग्य योजनांचा लाभ दिला जाणार आहे.आदिम जमाती व पारधी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी वस्तीशाळा, रात्रशाळा आणि प्रौढ शिक्षणाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे, शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आणि स्थलांतरित कुटुंबांतील मुलांसाठी उन्हाळ्यात आश्रमशाळांमध्ये निवासी शिबिरे आयोजित करण्याचाही पॅकेजमध्ये समावेश आहे.

पारधी समाजासाठी जनजागृती, आदिवासी संस्कृती व वनहक्कांचे संवर्धन

■ पारधी समाज आणि पोलीस यंत्रणा यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी आदिवासी विभागामार्फत संवाद व समाजप्रबोधनाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच पारधी समाजाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासह परस्पर विश्वास वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. आदिवासी संस्कृती, चालीरीती, कला, परंपरा आणि अस्मिता जपण्यासाठी विविध सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पेसा व वनहक्क कायद्याबाबत जनजागृती, वनहक्कधारकांना सहाय्य, वनउत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे, उपजीविकेसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण आणि प्रशिक्षणानंतर रोजगार व वनउत्पादनाधारित व्यवसायांसाठी मदत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



एसटीच्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना १० हजार रुपये दिवाळी भेट.!

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२,५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला.

एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. महामंडळ आर्थिक अडचणींचा सामना करत असतानाही कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेता येणार नाही, अशी ठाम भूमिका मंत्री सरनाईक यांनी यावेळी मांडली.

"एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे," असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या खंबीर पाठबळामुळे एसटी महामंडळाचे भविष्य उज्ज्वल असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन अथवा संपाचे हत्यार उपसू नये, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले. "एसटी ही सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी आहे. कोणत्याही आंदोलनामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये. कर्मचारी आणि प्रवासी हे एसटीचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर संवादातून मार्ग काढण्यास आम्ही सदैव तयार आहोत," असेही त्यांनी सांगितले.

SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH
ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED
TENDER NOTICE NO.01 OF 2026-2027

Sealed B-1 tenders for the following works are invited by the **SECRETARY, SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH, ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED** from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class. The blank tender form shall be issued to the **SECRETARY, SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH, ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED** during working hours on the dates given below. The sealed tender will be opened on the same day if possible. The details are as follows.

Sr. No.	Name of Work	Estimate Cost Rs.	Earnest Money (Rs.)	Period of issue of blank tender forms	Place, Date & Time of receipt of Tender	Time Limit for completion including monsoon	Type of Tender / & Cost of Blank Tender Forms (Non-Refundable)
1	PROPOSED ESTIMATE FOR CONSTRUCTION OF MASJID HALB STADIUM PO SHREE SADGURU BANJARA SEVASNICH SANGH, ANTHARWAN, SECONDARY & HIGHER SECONDARY (SENIOR) SCHOOL, ANTHARWAN PIMPRI TANDA, ON GUT NO. 226 AT ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED.	1,15,14,276/-	Nil	07/11/2026 to 18/11/2026	In the office of the SECRETARY, SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH, ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED on 19/11/2026 up to 14.00 Hours	12 Months	B-1 Rs. 2,000/-

Note :
1) Blank tender will be issued to original contractor or his authorized representative after signature should be attested by contractor himself after production of affidavit copy of registration along with his application.
2) Detailed tender notice can be seen on the Notice Board in the office of the SECRETARY, SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH, ANTHARWAN PIMPRI TANDA TQ, & DIST. BEED.
3) Right of change in tender notice, changes and corrections in tender documents as well as reject the tender without assigning the reason is reserved by the competent authority.

Secretary,
SHRI SADGURU BANJARA SEVA SANGH,
ANTHARWAN PIMPRI TANDA TQ. & DIST. BEED

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

संपादकीय

दिवाळीवर दुष्काळाचे संकट!

शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू, सरकारच्या घोषणांत आश्वासनांची आतषबाजी,अंधारलेल्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश आणणार कोण ?

समर्थ राजयोग | विशेष अग्रलेख

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, प्रकाशाचा आणि समृद्धीचा सण! घराघरांत दिव्यांची रोषणाई, अंगणात रांगोळ्या, बाजारपेठांत खरेदीची लगबग आणि लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहणारा हा सण. मात्र, यंदाची दिवाळी राज्यातील हजारो शेतकरी कुटुंबांसाठी आनंदाची नव्हे, तर चिंता, काळजी आणि आर्थिक विवंचनेची ठरत आहे. कारण त्यांच्या उंबरठ्यावर दिवाळी आली असली, तरी शेतातील उभ्या पिकांवर दुष्काळाचे सावट आहे. घरात दिवे लावण्याची वेळ आली आहे; पण शेतकऱ्यांच्या संसारात मात्र आर्थिक अंधार दाटला आहे.

यंदा पावसाने सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांची परीक्षा घेतली. कधी पावसाचा खंड, कधी अतिवृष्टी, तर कधी पावसाने दिलेली पूर्णपणे हुलकावणी, अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप हंगामाची पेरणी केली. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीसाठी कर्ज काढून शेतात पैसा ओतला. पिके डोळ्यांसमोर उभी राहिली; मात्र पावसाच्या अनियमिततेने आणि पाण्याच्या अभावाने उत्पादनावर गंभीर परिणाम झाला. काही ठिकाणी पिके हातची गेली, तर काही ठिकाणी अपेक्षित उत्पादनाच्या आशाही मावळल्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा येण्याऐवजी कर्जाचा डोंगर उभा राहिला आहे.

दिवाळी साजरी करायची तरी कशी ?

शहरी भागात दिवाळीनिमित्त खरेदी, मिठाई, कपडे, फटाके आणि सजावटीची रेलचेल सुरू आहे. मात्र ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांसमोर वेगळाच प्रश्न आहे. मुलांना नवीन कपडे घ्यायचे कसे? घरात फराळ करायचा कसा? दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी पैसा आणायचा कुठून? ज्यांच्या घामावर संपूर्ण समाजाची अन्नधान्याची गरज भागते, त्याच शेतकऱ्याच्या घरात सणाच्या दिवशी आर्थिक चणचण निर्माण होणे, ही केवळ दुर्दैवी बाब नाही, तर व्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी परिस्थिती आहे.

विशेषतः मराठवाड्यातील बीडसारख्या दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याची चिंता, रोजगाराचा अभाव आणि शेतीतून उत्पन्न मिळण्याची शक्यता कमी झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्रच विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांसोबतच शेतमजूर, छोटे व्यावसायिक, ग्रामीण कारागीर आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांनाही या दुष्काळाची झळ बसत आहे.

घोषणांचा पाऊस,प्रत्यक्ष मदतीची प्रतीक्षा.!

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन सरकारकडून विविध उपाययोजनांच्या घोषणा केल्या जातात. पंचनामे, पीक नुकसान भरपाई, दुष्काळी अनुदान, रोजगार हमीची कामे, चारा छावण्या, टँकरद्वारे पाणीपुरवठा अशा उपाययोजनांची चर्चा होते. परंतु प्रश्न असा आहे की, या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या खात्यात आणि त्यांच्या हातात किती वेगाने पोहोचतो?

शेतकऱ्याला मदत मिळण्यासाठी अनेक कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. कागदपत्रांची पूर्तता, पंचनाम्यांतील त्रुटी, प्रशासकीय मंजुरी आणि अनुदानाच्या प्रतीक्षेत त्याचा बहुमोल वेळ जातो. संकट मात्र कोणाचीही वाट पाहत नाही. सावकाराचे कर्ज, बँकेचे हप्ते, मुलांचे शिक्षण, घरखर्च आणि शेतीसाठी घेतलेल्या उधारीचा तगादा सुरूच असतो. अशा वेळी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा झाली, तरच त्या मदतीला खरा अर्थ आहे. अन्यथा दिवाळीनंतर मिळणाऱ्या मदतीचा उपयोग सणाच्या आनंदासाठी कसा होणार?

दुष्काळ हा केवळ शेतीचा प्रश्न नाही.!

दुष्काळाकडे केवळ पीक नुकसान म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. दुष्काळामुळे गावातील आर्थिक उलाढाल थांबते. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने बाजारपेठेतील खरेदी कमी होते. दुकानदार, व्यापारी, छोटे उद्योजक आणि मजुरांनाही त्याचा फटका बसतो. म्हणजेच दुष्काळाची झळ एका शेतकऱ्यापुरती मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला पोखरते.

त्यामुळे सरकारने केवळ नुकसान भरपाईच्या घोषणांवर समाधान मानू नये. पात्र शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीक विम्याच्या दाव्यांचा जलद निपटारा, शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीबाबत सहानुभूतीपूर्ण निर्णय, जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता, तसेच मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. बचत गटांच्या महिलांनाही कर्जवसुलीच्या जाचातून तात्पुरता दिलासा देण्याची गरज आहे.

लोकप्रतिनिधींनीही सामाजिक बांधिलकी दाखवावी..!

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या वेदना समजून घेण्याची जबाबदारी केवळ सरकारचीच नाही, तर लोकप्रतिनिधी, मंत्री, खासदार, आमदार आणि सामाजिक संस्थांचीही आहे. सणासुदीच्या काळात राजकीय कार्यक्रम, जाहिराती आणि उत्सवांवर होणारा खर्च काही प्रमाणात कमी करून दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेता येणार नाही का? सत्तेतील आणि विरोधातील लोकप्रतिनिधींनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एकत्र येण्याची हीच खरी वेळ आहे.

शेतकऱ्यांच्या घरात दिवाळीचा दिवा तेव्हाच उजळेल, जेव्हा त्यांच्या हातात आर्थिक मदत पोहोचेल. केवळ भाषणांमधून शेतकऱ्यांविषयी सहानुभूती व्यक्त करून चालणार नाही. त्यांच्या अडचणी समजून घेऊन प्रत्यक्ष कृती करावी लागेल.

दिवाळीचा खरा प्रकाश शेतकऱ्यांच्या घरात पोहोचू द्या.!

आज गरज आहे ती संवेदनशील प्रशासनाची, तत्पर सरकारची आणि जबाबदार लोकप्रतिनिधींची. दुष्काळग्रस्त शेतकऱ्याला मदत देताना त्याला सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या मारायला लावू नका. पंचनामे आणि कागदपत्रांच्या नावाखाली मदत लांबवू नका. पात्र लाभार्थ्यांची अचूक ओळख करून तातडीने मदत पोहोचवा. दुष्काळ हा नैसर्गिक असला, तरी त्यातून निर्माण होणाऱ्या संकटाची तीव्रता कमी करणे ही शासनाची जबाबदारी आहे.

दिवाळीच्या रात्री प्रत्येक घरात पणत्या उजळतील, फटाक्यांची आतषबाजी होईल, मिठाईचे वाटप होईल; पण त्याच वेळी एखाद्या शेतकऱ्याच्या घरात चुलीला आग लागण्यासाठीही पैसे नसतील, तर आपल्या उत्सवाच्या आनंदाला निश्चितच एक वेदनादायी किनार आहे.

शेवटी सरकारला एवढाच सवाल आहे...

शेतकऱ्यांच्या घामातून देशाची भूक भागते, शेतकऱ्यांच्या कष्टातून बाजारपेठा चालतात आणि शेतकऱ्यांच्या उत्पादनावर अर्थव्यवस्थेचे चक्र फिरते. मग त्याच शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट कोसळले असताना त्याला मदतीसाठी दिवाळी संपण्याची वाट का पाहावी लागावी ?

दिवाळीच्या शुभेच्छांच्या जाहिराती देण्यापेक्षा दुष्काळग्रस्तांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा करा. आश्वासनांच्या फुलबाज्या उडवण्यापेक्षा प्रत्यक्ष मदतीचे दिवे पेटवा. कारण शेतकऱ्यांच्या घरातील अंधार दूर झाला, तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल.

शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसल्याशिवाय दिवाळीचा प्रकाश पूर्ण होणार नाही, हे सरकारने विसरू नये.!

— समर्थ राजयोग विशेष अग्रलेख

टँकर, नियंत्रण कक्ष आणि गावोगावी नियोजन टंचाई विरुद्ध जिल्हा प्रशासनाची सज्जता..!

विशेष लेख...

बीड - यंदा एल-निनोच्या प्रभावामुळे बीड जिल्ह्यात पावसाने सरासरीपेक्षा कमी हजेरी लावली. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ५६६.१ मिमी असताना ३० सप्टेंबर २०२६ अखेर प्रत्यक्षात ३५६.६ मिमी, म्हणजे सुमारे ६३ टक्के पाऊस झाला. ऑगस्टमध्ये केवळ १८.७ टक्के आणि सप्टेंबरमध्ये ४१.६ टक्के पाऊस पडल्याने पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने वेळीच पावले उचलली आहेत.

धरणांतील पाणीसाठा केवळ पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा आदेश १२ जून २०२६ रोजीच काढण्यात आला. टँकर मंजुरीचे अधिकार १२ सप्टेंबर २०२६ च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले, त्यामुळे गावांच्या मागणीवर तातडीने निर्णय घेता येत आहे. २ नोव्हेंबर २०२६ रोजी १७२ गावे आणि १८३ वाड्यांतील ४,२९,८४२ लोकसंख्येला २९४ टँकर आणि ४५ विहीर/बोअर अधिग्रहणांद्वारे पिण्याचे पाणी पुरवले जात आहे. यापैकी २५७ टँकर ग्रामीण भागात, तर ३७ नागरी भागात कार्यरत आहेत. गेवराई (१२५) आणि आष्टी (७४) तालुक्यांत सर्वाधिक टँकर सुरू आहेत.

टँकर भरण्यासाठी जिल्हा परिषदेने ८९ फिलिंग पॉइंट निश्चित केले असून तालुकानिहाय आश्वासित जलस्रोतांची यादी तयार आहे. सुरू असलेल्या सर्व टँकरची उपविभाग बदलून क्रॉस तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून पुरवठा पारदर्शक आणि सुरळीत राहील. भूजलाचे संरक्षण करण्यासाठी २ नोव्हेंबर २०२६ च्या आदेशाने जिल्ह्यात नवीन बोअरवेल खोदकामावर निर्बंध घालण्यात आले असून यापुढे उपविभागीय अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी बंधनकारक आहे.

जिल्हाधिकारी स्तरावर सविस्तर दुष्काळ व्यवस्थापन मास्टर प्लॅन तयार केला जात आहे. ऑगस्ट २०२७ पर्यंतचा ग्रामीण व शहरी कृती आराखडा, ग्रामपंचायत स्तरावर दुष्काळ निवारण समित्या, गावनिहाय संवेदनशीलता नकाशा (Vulnerability Mapping), प्रत्येक तालुक्यात नियंत्रण कक्ष आणि जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांच्या नियमित गावस्तरीय बैठका हे या नियोजनाचे मुख्य घटक आहेत. अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, जलसंपदा, पोलीस, महावितरण व स्थानिक स्वराज्य संस्थांची संयुक्त पथके नेमण्यात आली आहेत. टंचाई ही आपत्ती नसून नियोजनाची कसोटी आहे, हेच प्रशासनाच्या या सज्जतेतून दिसून येते.

विशेष लेख / शब्दांकन..
जिल्हा माहिती कार्यालय, बीड

राज्यातील भरती परीक्षा सुधारणांसाठी गठित उच्चस्तरीय समितीचा अंतरिम अहवाल शासनास सादर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क परीक्षेसाठी पदसंख्येत वाढ

वयोमर्यादेत सवलत आणि परीक्षा प्रक्रियेच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण शिफारशी

मुंबई प्रतिनिधी

राज्यातील भरती परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय दिनांक 4 सप्टेंबर 2026 अन्वये उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने राज्यातील विविध विभागांमधील विद्यार्थी व संबंधित हितधारकांशी केलेल्या सल्ला मसलतीदरम्यान प्राप्त मागण्या, सूचना व अभिप्रायांचा अभ्यास केला आहे.

विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या व तातडीच्या मुद्यांवर प्राधान्याने निर्णय घेणे आवश्यक असल्याने समितीने अंतरिम अहवाल शासनास सादर केला आहे. उच्चस्तरीय समितीच्या प्रमुख शिफारशी, परीक्षेतील पदसंख्येत वाढ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2026 या परीक्षेसाठी सुमारे 12 लाख उमेदवारांनी अर्ज केले असून सध्यास्थितीत 5 हजाराहून अधिक पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध विभागांकडून आणखी 11 हजाराहून अधिक पदांची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे. ही अतिरिक्त पदे शुद्धिपत्रकाद्वारे समाविष्ट करून एकूण पदसंख्या 16 हजारापेक्षा अधिक करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

सर्व भरती परीक्षांसाठी कमाल वयोमर्यादेत एक वेळची एक वर्षाची सवलत उमेदवारांच्या मागण्यांचा विचार करून कमाल वयोमर्यादेत एक वेळची विशेष बाब म्हणून एक वर्षाची सवलत देण्याची शिफारस करण्यात आली आहे. ही सवलत दिनांक 1 जानेवारी 2026 नंतर प्रसिद्ध झालेल्या व निवड प्रक्रिया सुरू न झालेल्या सर्व जाहिराती, तसेच दिनांक 31 डिसेंबर 2027 पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी लागू राहील. तसेच, गट-क परीक्षा 2026 परीक्षेसाठी अतिरिक्त पदांकरीता व वयोमर्यादा सवलतीमुळे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी अर्ज प्रक्रिया एकदा पुन्हा सुरू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या परीक्षा प्रक्रियेबाबत इतर महत्त्वाच्या शिफारशी गट-क पूर्व परीक्षेच्या विद्यमान परीक्षा पद्धतीत व अभ्यासक्रमात कोणताही बदल न करणे, नव्याने समाविष्ट होणाऱ्या संवर्गांचे मुख्य परीक्षेचे अभ्यासक्रम लवकरच जाहीर करणे, खबरदारीचा उपाय म्हणून यापूर्वीची प्रश्नपत्रिका निर्मितीची कार्यवाही रद्द करून सुरक्षित प्रक्रियेद्वारे नव्याने प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिका व ओएमआर उत्तरपत्रिकांची छपाई, साठवणूक व वाहतूक यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवणे, तसेच परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही देखरेख, सिग्नल जॅमर आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची व्यवस्था करणे आदी शिफारशी समितीने केल्या आहेत.

एनसीएमसी कार्डसाठी नवीन वर्षापर्यंत मुदतवाढ.!

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत शासनाच्या निर्देशानुसार समाजातील विविध घटकांना सवलतीच्या दरात प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या सवलतींचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावीपणे मिळावा, यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिला लाभार्थ्यांची कार्ड नोंदणी अद्याप अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच विविध सामाजिक संघटना, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे नेते आणि मंत्री महोदयांकडून करण्यात आलेल्या विनंत्या व सूचनांचा सकारात्मक विचार करून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला १ जानेवारी २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या प्रवासात मिळणाऱ्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी १ ऑक्टोबर २०२६ पासून एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. आतापर्यंत सुमारे १ कोटी १० लाख कार्डांची नोंदणी व वितरण करण्यात आले आहे. मात्र, ग्रामीण भागातील अनेक महिला लाभार्थ्यांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचली नसल्याने त्या अद्याप स्मार्ट कार्डपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब लक्षात घेऊन एसटी महामंडळाने आता ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून ही शिबिरे राबविण्यात येणार आहेत. या विशेष मोहिमेद्वारे ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांची १०० टक्के एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने निश्चित केले आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी जलसंधारणाची लोकचळवळ उभी करा-जिल्हाधिकारी कर्डिले

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानासाठी समन्वयाने काम करण्याचे सीईओ महेश पाटील यांचे निर्देश

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

दुष्काळ आणि पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारणाची विविध कामे लोकसहभागातून हाती घेऊन श्रमदानाची व्यापक लोकचळवळ उभी करावी. प्रशासनाने केवळ नियोजनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून गावांचा विकास साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाच्या वतीने अर्धापूर तालुक्यातील डौर येथील नंदीग्राम पर्यटन केंद्रात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान 2.0 कार्यशाळा आणि जिल्हास्तरीय दुष्काळ व पाणीटंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

जिल्हाधिकारी कर्डिले म्हणाले, व्ही.बी.-जी रामजीच्या माध्यमातून माती नाला बांध, जलसंधारण आणि पाणलोट विकासाची कामे नियोजनबद्ध पद्धतीने राबवावीत. गावांमध्ये लोकसहभाग वाढवून श्रमदानाला प्रोत्साहन द्यावे. चांगले काम करणाऱ्या गावांमध्ये मी स्वतः, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी श्रमदानात सहभागी होणार असून, आठवड्यातून किमान दोन ठिकाणी भेट देण्याचा प्रयत्न राहील. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान केवळ शासकीय उपक्रम न ठेवता लोकचळवळ बनवावे. गावविकास, जलसंधारण, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक परिवर्तनासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. या कामांसाठी प्रशासन खंबीरपणे पाठीशी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी अभियानातील गुणांकन निकषांनुसार कामांचे नियोजन करून सर्व विभागांनी एकजुटीने काम करण्याचे निर्देश दिले. ग्रामस्तरावरील प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी विभागांमध्ये समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यालयाकडून प्राप्त



सूचना तातडीने ग्रामस्तरापर्यंत पोहोचवाव्यात. दर सोमवारी विभागनिहाय आढावा घेऊन प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत. ग्रामसेवकांनी शासकीय अभिलेख अद्ययावत ठेवण्यासह घरकुल, पाणीपुरवठा, स्थानिक निधी, जल व मृदसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. बालविवाह प्रतिबंध आणि व्यसनमुक्तीसारख्या सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य द्यावे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम केल्यास नांदेड जिल्हा या अभियानात अव्वल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेत मधुकर मोरे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचे सादरीकरण केले. पाणीटंचाई, घनकचरा व्यवस्थापन आणि चारा टंचाई या विषयांवर अनुक्रमे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, मयूरकुमार आंदेलवाड आणि डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी मार्गदर्शन केले. ग्रामसेवक संघटनेचे अमृत शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी यांनी केले, तर आभार सहाय्यक गटविकास अधिकारी सुधीर पाटील यांनी मानले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, डी.बी. गिरी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहातून आदिवासी बांधवांना योजनांचा लाभ

११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान राज्यभर विविध उपक्रम शैक्षणिक, आर्थिक, आरोग्यविषयक व सामाजिक सक्षमीकरणावर भर

मुंबई प्रतिनिधी

भगवान बिरसा मुंडा गौरव दिवस सेवा सप्ताहानिमित्त ११ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना शासकीय योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे, विविध शासकीय सेवांचा लाभ सुलभ करणे तसेच त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या जल, जंगल, जमीन आणि पारंपरिक हक्कांच्या संरक्षणासाठी केलेल्या संघर्षाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिन' म्हणून घोषित केला आहे. आदिवासी स्वातंत्र्यवीरांचे योगदान, संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा आणि अस्मिता यांचे जतन व संवर्धन करून हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ, सेवा वितरणावर भर

सेवा सप्ताहाच्या पहिल्या दिवशी ११ नोव्हेंबर रोजी सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये पत्रकार परिषदांचे आयोजन करण्यात येणार आहे. तर १२ नोव्हेंबर रोजी अनुसूचित जमातीबहुल तालुक्यांच्या मुख्यालयांमध्ये पत्रकार परिषदांच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न आणि शासकीय योजनांची माहिती देण्यात येईल. १३ नोव्हेंबर रोजी पात्र लाभार्थ्यांना न्यूक्लियस बजेटअंतर्गत धनादेशांचे वितरण करण्यात येणार असून, धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान, प्रधानमंत्री जनमन योजना आणि अन्य शासकीय योजनांचे लाभ दिले जाणार आहेत. महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्याबरोबरच स्वयंरोजगार, व्यवसाय, कृषिपूरक उद्योग, सिंचन आणि उत्पादनवाढीसाठी मार्गदर्शन करण्यात येईल.

शिक्षण, रोजगार व आर्थिक स्वावलंबनासाठी विशेष उपक्रम

■ १८ नोव्हेंबर रोजी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या उपक्रमांनी सेवा सप्ताहाचा समारोप होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, जात वैधता प्रमाणपत्र, व्यावसायिक शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. युवक-युवतींसाठी कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, अप्रेंटिसशिप आणि स्वयंरोजगाराच्या संधींबाबत माहिती देण्यात येणार आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांसाठी कृषी, पशुसंवर्धन आणि कौशल्य विकास योजनांची माहिती देण्यात येईल. बँक खाते, डिजिटल व्यवहार, आर्थिक साक्षरता, सेंद्रिय शेती, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि बाजारपेठ जोडणी याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या सेवा सप्ताहाच्या माध्यमातून आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने उपलब्ध करून देण्याबरोबरच विविध शासकीय सेवांची माहिती एकाच ठिकाणी देणे आणि आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे यासाठी आदिवासी विकास विभाग प्रयत्नशील आहे

१४ नोव्हेंबर रोजी राज्यातील आदिवासी स्मारके आणि महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता व देखभाल करण्यात येणार आहे. सायंकाळी दीपोत्सवाचे आयोजन करून आदिवासी देव-देवता, पूजापद्धती, परंपरा आणि सांस्कृतिक अस्मितेचे दर्शन घडविण्यात येईल. याच दिवशी गडचिरोली येथे भगवान बिरसा मुंडा आदिवासी सेवक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

१५ नोव्हेंबरला गडचिरोली येथे देशस्तरीय मुख्य शासकीय कार्यक्रम

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर रोजी गडचिरोली येथे देशस्तरावरील मुख्य शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास राज्यपाल, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यानिमित्त राज्यातील सर्व जिल्हा आणि अनुसूचित जमातीबहुल तालुका मुख्यालयांमध्ये भगवान बिरसा मुंडा तसेच अन्य आदिवासी महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात येईल. पद्म पुरस्कारप्राप्त आदिवासी व्यक्ती, सामाजिक नायक, समाजसेवक, बुद्धिजीवी, आदिवासी संत-महंत तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व समूहांचा सन्मान करण्यात येणार आहे. आदिवासी महापुरुषांच्या नावाने उद्याने, चौक आणि रस्त्यांचे नामकरण तसेच ऐतिहासिक वारशाच्या जतनाचे उपक्रमही राबविण्यात येतील.

१६ नोव्हेंबर रोजी आदिवासी बांधवांसाठी विशेष सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमध्ये आधार कार्ड दुरुस्ती व अद्ययावतीकरण, वनपट्टेधारकांना विविध योजनांचे लाभ मिळवून देणे, शासकीय योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि पात्र लाभार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी सहाय्य करण्यात येईल. तसेच शेतकरी नोंदणी, पीकविमा, कृषी विभागाच्या ऑनलाइन सेवा आणि डिजिटल माध्यमातून शासकीय सेवा मिळविण्याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आदिवासी बांधवांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन १७ नोव्हेंबर रोजी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये रक्तदाब व मधुमेह तपासणी, सिकलसेल आजाराबाबत जनजागृती व तपासणी, माता-बाल आरोग्य आणि पोषणविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच पोषणबाग, परसबाग, पौष्टिक तृणधान्ये, कडधान्ये आणि स्थानिक अन्नपिकांचे आहारातील महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात येईल.

महीला किसान अधिकार मंचच्या वतीने

ऊसतोड कामगार व शेतकरी महीलांना सायकल वाटप

बीड प्रतिनिधी

ऊसतोड कामगार वशेतकरी महीलांसाठी सायकल वाटपाचा कार्यक्रम बीड शहरात माळी वेस येथील ए वन सायकल स्टोअर्स येथे पार पडला. महीला किसान अधिकार मंच च्या वतीने व सोफेकॉम पुणे यां सस्थेच्या सहकार्याने या सायकल वाटप करण्यात आल्या. दुष्काळी परिस्थितीत महीलांना दूरुन पाणी आणावे लागते तसेच शेतातील कामे करण्यासाठी घरापासून दूर जावे लागते. घरातील जवळपास सर्व कष्टाची कामे महीलांना करावी लागतात, ही कष्टाची कामे थोडीशी सुखकर व्हावी म्हणून या सायकलींचे महीलांना वाटप केले आहे.

असे मनोगत सायकल वाटप करताना शेतकरी, ऊसतोड व इतर असंघटीत कामगार मंचच्या मनिषा तोकले यांनी सांगितले.

महीलांना सायकल वाटप कार्यक्रमात अशोक तांगडे, तत्वशील कांबळे, दीपा वाघमारे, रूपाली डोंगरे, अलका माटे यांच्या हस्ते महीलांना सायकल वाटप करण्यात आले.



दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
वेचक वृत्त
शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६
Saturday ७ November 2026



आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश

मुख्यमंत्री सहायता निधीतून आष्टी तालुक्यातील ३ रुग्णांना प्रत्येकी ५० हजारांची वैद्यकीय मदत मंजूर

आष्टी / एस .राजेंद्र लाड

आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च पेलणे अनेक सर्वसामान्य कुटुंबांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. अशा संकटाच्या काळात गरजू रुग्णांना आर्थिक आधार मिळावा आणि पैशांअभावी कोणाचेही उपचार थांबू नयेत, या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्री सहायता निधीतून आष्टी तालुक्यातील तीन रुग्णांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची वैद्यकीय मदत मंजूर करण्यात आली आहे. आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे एकूण दीड लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध झाले असून, यामुळे संबंधित रुग्णांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यामध्ये खडकत येथील दादासाहेब रावडे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच आष्टी येथील आबासाहेब साबळे यांच्या उपचारासाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे. याशिवाय खुंटेफळ (ता. आष्टी) येथील कल्याणी कोहक यांच्या नवजात बाळाच्या वैद्यकीय उपचारासाठीही मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. अशा प्रकारे आष्टी तालुक्यातील तीन गरजू रुग्णांना एकूण एक लाख ५० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळणार आहे.आर्थिक अडचणींमुळे गंभीर आजारांवरील उपचारांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, गरजू रुग्णांना वेळेवर उपचार घेता यावेत आणि संकटग्रस्त कुटुंबांना आधार मिळावा, यासाठी आमदार सुरेश धस सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत असतात. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाकडूनही विशेष प्रयत्न केले जात आहेत.

या मदतप्रक्रियेत आमदार सुरेश धस यांच्या कार्यालयातील रुग्णसेवक अमर वाळके, विकास साळवे, शरद रेडेकर, दत्ता हूले आणि विनोद वाघ यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. गरजू रुग्णांची माहिती संकलित करणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे तसेच मदत मंजुरीसाठी पाठपुरावा करणे, अशा कामांतून त्यांनी रुग्णसेवेचे कार्य केले.संकटाच्या काळात गरजू रुग्णांच्या पाठीशी उभे राहून त्यांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्याच्या या उपक्रमामुळे खडकत, आष्टी आणि खुंटेफळ येथील संबंधित कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनाच्या मदत योजनांचा लाभ गरजूंपर्यंत पोहोचत असल्याने या मदत कार्याचे परिसरातून स्वागत होत आहे.

नासा-इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी आष्टी तालुक्यातील 3 विद्यार्थ्यांची निवड

यश झांजे याची नासा व इस्त्रो सहलीसाठी प्रथम क्रमांकाने निवड, शिवांश गव्हाणे व समृद्धी महाजन यांनाही मिळाली संधी

आष्टी प्रतिनिधी

जिल्हा परिषद बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नासा व इस्त्रो या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या अंतराळ संशोधन संस्थांच्या शैक्षणिक सहलीसाठी आष्टी तालुक्यातील तीन गुणवंत विद्यार्थ्यांची अंतिम गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. या निवडीमुळे आष्टी तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे.

जिल्हा परिषद बीड अंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेच्या आधारे नासा व इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी तालुकानिहाय अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये आष्टी तालुक्यातून यश डी. झांजे याने इयत्ता आठवीतून ६६ गुण मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाहिरा येथे शिक्षण घेत असलेल्या यशची नासा व इस्त्रो या दोन्ही शैक्षणिक सहलींसाठी निवड झाली आहे.

तसेच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा नंबर १ येथील इयत्ता सहावीचा विद्यार्थी शिवांश एस. गव्हाणे याने ५८ गुण मिळवून इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पालवे महाडिक वस्ती येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी समृद्धी एस. महाजन हिने ५७ गुण मिळविले असून, कन्या राखीव प्रवर्गातून तिची इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे.



विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासातील सातत्य, जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अंतराळ संशोधन, विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी या विद्यार्थ्यांना मिळणार असल्याने त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला निश्चितच नवी दिशा मिळणार आहे.

या यशामुळे वाहिरा, कडा आणि पालवे महाडिक वस्ती येथील शाळांचा नावलौकिक वाढला असून, गटविकास अधिकारी श्री. प्रयाग ढमाळ, कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि शिक्षणप्रेमींमधून या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्ञान संपादन करण्याची क्षमता असून, योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाल्यास ते मोठी भरारी घेऊ शकतात, हे या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

दिवाळीनिमित्त निराधार बांधवांना किराणा किटचे वाटप

वडवणी प्रतिनिधी

दिवाळी सणाचे औचित्य साधून निराधार व गरजू बांधवांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, या सामाजिक भावनेतून किराणा किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विजयराव टिकुळे, प्रदीप तिदार (पोलीस अधीक्षक), शिवराज म्हेत्रे साहेब (पोलीस निरीक्षक, मुंबई), दत्तात्रय दिंडकर साहेब (राज्य उत्पादन शुल्क विभाग), बालाजी चिनके, सुरेश आसलकर, मल्हारराव ढोले व सागर म्हेत्रे यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रम प्रसंगी नारायणराव डिगे (चेअरमन), ज्ञानेश्वर महाराज रोकडे (अध्यक्ष), कैलास भुजबळ, दिगंबर आलगट, कल्याण वारे, किसन जाधव, लहू खारगे, कृष्णा पंधारे, जालिंदर चिनके, सिद्धेश्वर ढवळशंख, किरण रेडेकर, गणेश फासे आदी मान्यवरांच्या हस्ते निराधार व गरजू बांधवांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.



दिवाळी हा आनंद, उत्साह आणि माणुसकीचा सण आहे. या सणानिमित्त गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून, समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा सामाजिक उपक्रमांसाठी पुढाकार घ्यावा, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

पाथरड येथे दूध भाव फरक वितरण कार्यक्रम, दुष्काळ निवारणावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन

तामसा (प्रतिनिधी)

पाथरड उत्पादक असोसिएशनच्या वतीने हदगाव तालुक्यातील पाथरड येथे दूध भाव फरक वितरण कार्यक्रम तसेच दुष्काळ निवारण व उपाययोजनांबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, तहसीलदार सय्यद उमर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी के. आडेराघो, पशुसंवर्धन अधिकारी शिंदे यांच्यासह विविध शासकीय विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे संगोपन, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता तसेच दुष्काळ निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधत दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासनाच्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. तसेच उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करून शेती व पशुपालन व्यवसाय टिकवून ठेवण्याबाबत मार्गदर्शन केले.

जाहिर प्रगटन

जन्म नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत. श्रीमती. एम. एस. कुलकर्णी न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग केज यांचे न्यायालयात

किरकोळ फौ अर्ज क ४७३/२०२६ सचिन विरुध्द नगर पंचायत केज कलम १३ (३) जन्म-मृत्यु कायदया अन्वये **ज्यापेक्षा सचिन दशरथ बल्लाळ** रा. चंदवाडी, फुरसुंगी पुणे यांनी त्यांचा मुलगा नामे शिवतेज सचिन बल्लाळ जन्म दिनांक ३०/०८/२०११ रोजी केज येथे झालेला असुन अर्जदारांनी जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे. वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार हयांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्माचे प्रमाणपत्र कायदेशीर असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल. त्याची पुढील तारीख १६/१२/२०२६

आज ता. ०५ माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी माझे सहीनिसी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला.

कनिष्ठ लिपीक
आदेशावरुन
(सहा. अधिक्षक)
फौजदारी न्यायालय क. स्तर केज

जाहिर प्रगटन

मा. श्रीम. पी. व्ही. चव्हाण, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग केज (न्यायालय क. ३), ता. केज, जि. बीड यांचे न्यायालयात फौजदारी किरकोळ अर्ज क. ४१३/२०२६

सुहास विरूध्द ग्रा.पं. का. तरनळी नेमलेली तारीख १९/१२/२०२६

धर्मराज सरवदे, रा. तरनळी, ता. केज, जि. ज्याअर्थी अर्जदार नामे सुहास बीड यांनी त्यांची मुलगी नामे आदिती सुहास सरवदे हीच्या जन्म दि. ३०/०४/२०११ रोजी मौजे तरनळी, ता. केज, जि. बीड येथे झाला आहे. तरी ग्राम पंचायत कार्यालयाच्या जन्म मृत्यू नोंदवहीला त्यांचे जन्माची नोंदी घेण्यात आलेली नाही. सदरील अर्जदाराच्या मुलीच्या जन्माची नोंदी ग्राम पंचायत कार्यालय तरनळी, ता. केज, जि. बीड यांचेकडील जन्म मृत्यू नोंदवहीला घेणेबाबत संबंधीतास आदेशीत करणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा अर्जदाराच्या मुलीची जन्माची नोंदी बाबत हरकती असतील तरी याबाबत नोटीस प्रसिध्दीपासून दिनांक १९/१२/२०२६ रोजी पर्यंत आपण या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यां तर न्यायालय सदरहू अर्जदाराच्या मुलीचा जन्म वरील प्रमाणे झाला आहे याबाबतचा लागलीच पुरावा घेवून सदरहू अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्राम पंचायत तरनळी जन्म-मृत्यू नोंदवहीला घेणबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०५ माहे नोव्हेंबर २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिला.

पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज सदरची नोटीस ग्राम पंचायत कार्यालय तरनळी, ता. केज, जि. बीड येथील नोटीस बोर्डावर डकवावी व डकवलेचा पंचनामा दिनांक १९/१२/२०२६ रोजी पर्यंत या न्यायालयात दाखल करावा.

कनिष्ठ लिपीक
आदेशावरुन
(सहा. अधिक्षक)
फौजदारी न्यायालय क. स्तर केज

जाहिर प्रगटन

मा. श्रीम. पी. व्ही. चव्हाण, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग केज (न्यायालय क्र.३), ता. केज, जि. बीड यांचे न्यायालयात

फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ४७२/२०२६ अजित विरुद्ध का. सबला नियुक्ती दिनांक ३०/१२/२

ज्याअर्थी अर्जदार नामे अजित अभिमन्यु सरवदे, रा. साबला, ता. केज, जि. बीड यांनी त्यांची मुलगी नामे संघवी अजित सरवदे हीच्या जन्म दि. २८/११/२०११ रोजी मौजे आनंदवाडी, ता. केज, जि. बीड येथे झाला आहे. तरी ग्राम पंचायत कार्यालयाच्या जन्म मृत्यू नोंदवहीला त्यांचे जन्माची नोंदी घेण्यात आलेली नाही. सदरील अर्जदाराच्या मुलीच्या जन्माची नोंदी ग्राम पंचायत कार्यालय साबला, ता. केज, जि. बीड यांचेकडील जन्म मृत्यू नोंदवहीला घेणेबाबत संबंधीतास आदेशीत करणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा अर्जदाराच्या मुलीची जन्माची नोंदी बाबत हरकती असतील तरी याबाबत नोटीस प्रसिध्दीपासून दिनांक ३०/१२/२०२६ रोजी पर्यंत आपण या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर न्यायालय सदरहू अर्जदाराच्या मुलीचा जन्म वरील प्रमाणे झाला आहे याबाबतचा लागलीच पुरावा घेवून सदरहू अर्जदाराच्या जन्माची नोंद ग्राम पंचायत साबला जन्म-मृत्यू नोंदवहीला घेणबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०५ माहे नोव्हेंबर २०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्कयानिशी दिला.

पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे केज सदरची नोटीस ग्राम पंचायत कार्यालय साबला, ता. केज, जि. बीड येथील नोटीस बोर्डावर डकवावी व डकवलेचा पंचनामा दिनांक ३०/१२/२०२६ रोजी पर्यंत या न्यायालयात दाखल करावा.

कनिष्ठ लिपीक
आदेशावरुन
(सहा. अधिक्षक)
फौजदारी न्यायालय क. स्तर केज

जाहीरनामा

दिनांक. 02/11/2076

मौजे चनई येथील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, अर्जदार ची/श्रीमती कल्पना भागवत जयतपाळ रा. अवळगाव जि. परभणी यांनी खरेदी खत क्र. 8078 दि. 30/10/2026 अन्वये श्री श्रीमती **अमिल ज्ञानोबा गायके** रा आडस यांच्या कडून सदर जागा घेतली आहे.

सदर जागेचे वर्णन: घर नं 2383 गट/सर्व्हे नं 147 प्लॉट 4 पूर्व-पश्चिमः.17 मी/फुट, दक्षिण-उत्तरः- 9 मी/फुट, एकूण क्षेत्रफळ = 153 चौ.मी. फुट.

चतुः सीमा
पुर्वेस-लॉर्ट क्र.7
पश्चिमी: 9 मी रस्ता
दक्षिणेकडीलः- लॉर्ट क्र.3
उत्तरः- प्लेट क्र. ५

याप्रमाणे वरील लांबी व चतुः सिमेचे आतील जागेची नोंद न नं. 8 ला करणे बाबत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर नोंदीबाबत ज्या कोणास उजर असेल त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झालेचे तारखेपासून 15 दिवसाचे आत सदर जागेबाबत लेखी कागदपत्रासह कार्यालयीन वेळेत उजरदारी सादर करावी नसता मुदतीनंतर अर्जदाराचे नांव रितसर न नं.8 ला केली जाईल याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

करिता हा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सरपंच
रोहिणी प्रभाकर सावने
ग्रामपंचायत कार्यालय, बनई ता. अंदाजोगाई, जि. बीड

उपसरपंच
अमिश वसंतराव शिंदे
ग्रामपंचायत कार्यालय, बनई ता. अंदाजोगाई, जि. बीड

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, बनई ता. अंदाजोगाई, जि. बीड

जाहिर प्रगटन

ॲड. आर. पी. धसे मा. श्री. एम. एस. जेलर ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज १४०७/२०२६

कांताबाई व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. कांताबाई भ्र. तुळजीराम उर्फ बबन मस्के, वय-५४ वर्षे, धंदा घरकाम,रा. पालवण ता. जि. बीड
२. सुदाम पि. तुळजीराम मस्के, वय-३४ वर्षे, धंदा शेती, रा. सदर
३. ऋषीकेश पि. तुळजीराम मस्के, वय-२७ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर
४. पुजा भ्र. अभिजीत जाधव, वय-२९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. रायमोहा ता. शिरूर का. जि. बीड
५. आकांक्षा भ्र. युवराज मते, वय-२५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. कोपरा पो. पाचेगाव ता. गेवराई जि. बोली
६. सोजरबाई भ्र. सुदाम मस्के, वय-८७ वर्षे, धंदा-घरकाम रा. पालवण ता. जि. बीड
(अर्जदार हे भारतीय आहेत)

गैरअर्जदार:- निरंक मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत तुळजीराम सुदाम मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत तुळजीराम सुदाम मस्के यांचा मृत्यु दिनांक ०२.०६.२०२६ रोजी मेडीकेअर हार्ट हॉस्पीटल ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क.१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क.४ व ५ मयताच्या विवाहीत मुली आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत तुळजीराम सुदाम मस्के यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. 25-11-2026

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आदेशावरुन स्वाक्षरीत /
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिर प्रगटन

मा. श्रीमती एम. एस. पठारे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं. २. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ फौजदारी अर्ज/११०२/२०२६ विकास रोहिदास राठोड वि. ग्रामसेवक

अर्जदार : विकास रोहिदास राठोड
वय-३०, धंदा-शेती, रा. कामखेडा ता. जि. बीड

विरुध्द

गैर-अर्जदार:- जन्म मृत्यू निबंध्क तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कामखेडा, ता. जि. बीड

मागणी अर्ज:- रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये मृत्युची नोंद घेण्याबाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात त्यांच्या वडिलांची मृत्युची नोंद जन्म मृत्यु निबंधक तथा म जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामंपचायत कार्यालय कामखेडा ता. जि. बीड या कार्यालयाच्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार नामे विकास रोहिदास राठोड हयांचे वडिल नामे रोहिदास खेमा राठोड हयांचा मृत्यु दि. २६/११/१९९९ रोजी राहते घरी झाला असल्याचे अर्जदार यांनी त्यांचे अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांना त्यांच्या वडिलांच्या मृत्युची नोंद प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्युची नोंद जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामंपचायत कार्यालय कामखेडा ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना त्यांच्या जन्माची नोंद जन्म मृत्यु निबंधक तथा ग्रामसेवक ग्रामंपचायत कार्यालय कामखेडा ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्रला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी.दिले. आज दिनांक ०४.११.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदर प्रकरणाची पुढील तारीख २२.१२.२०२६ आहे.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आदेशावरुन स्वाक्षरीत /
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिर प्रगटन

मा.श्री. रिजवान उ. शेख ३रे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क. १८१८/२०२६

ॲड. टेकाडे वाय.एस.

कोनताबाई व इतर वि. निरंक

ज्यापेक्षा नवनाथ भानुदास इंदरे, हे दिनांक २७/०२/२०२६ रोजी, शहाजानपुर, कामखेडा, ता.जि. बीड, येथे मयत झालेले आहेत, तसेच

अर्जदार

१. कोनताबाई भ्र. नवनाथ इंदुरे, वय.७८ वर्षे, धंदा. घरकाम, रा. शहजानपूर, कामखेडा, ता.जि. बीड
२. जोगनाथ पि.नवनाथ इंदुरे, वय. ४३ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे
३. राम पि.नवनाथ इंदुरे, वय. ३७ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे
४. शिवकन्या भ्र.बंडु सुरवसे, वय.५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा.तळेगाव, ता.जि.बीड

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले व अर्जदार क. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे, मयताचे आई वडिल फार वर्षापुर्वीच मयत झालेले आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांत मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे काणोस समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोट, सदरहु अर्जदारांच्या हक्कांतबददल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा /अर्जदारांच्या हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे नवनाथ भानुदास डुंदरे, हे यांचे वारस असल्याबाबतचे नोंद घ्यावी. प्रमाणपत्र देण्यात येईल, याचीप्रकरणाची पुढील तारीख : ०५/१२/२०२६ ही आहे. आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

आदेशावरुन स्वाक्षरीत /
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

जाहिर प्रगटन

श्रीमती सुचिता एच.राठी,अति मुख्य न्यायदंडाधिकारी,न्या.क्र.३,अंबड कृष्णा वि ग्रा.प.साडेसावंगी किरकोळ फौजदारी अर्ज ५९०/२६ पुढील तारीख २६/११/२०२६

अर्जदार :- कृष्णा दगडु घाडगे वय ५५ रा.साडेसावंगी ता.अंबडवि.मुख्याधिकारी,नगर परिषद अंबड / ग्रम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय साडेसावंगी ता.अंबड ----------कलम - जन्म - मृत्यू अधिनियम १९६९ व २०२६ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत.---------- --ज्याअर्थी अर्जदार नामे कृष्णा दगडु घाडगे,रा.साडेसावंगी ---------- यांनी त्यांची आई नामे सुलाबाई दगडु घाडगे यांचा मृत्यू दिनांक १९/०१/२०२१ रोजी मौजे साडेसावंगी ता.अंबड येथे झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदार कार्यालय यांचेकडे होणेसाठी व मृत्यू प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात ॲड एस.ए.काळबंडे यांच्यामार्फत अर्ज दाखल केलेला आहे.त्या अर्थी या मृत्यू नोंदी बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत उक्त न्यायालयात लेखी आक्षेप दाखल करावा.आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी
न्या.क्र.३ अंबड

सहा.अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय अंबड

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)

मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जायकाकडून २० हजार कोटींच्या अर्थसहाय्याबाबत सकारात्मक प्रतिसाद

मुंबई प्रतिनिधी

मराठवाड्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवून या भागाला दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती द्यावी. प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल तातडीने अपलोड करून केंद्र सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाकडे पाठविण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील वर्षा शासकीय निवासस्थानी जायकाच्या वरिष्ठ शिष्टमंडळासमवेत उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या आराखड्यासह महाराष्ट्र आणि जपान यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (JICA) कडून सुमारे २० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे.



चार जिल्ह्यांना पहिल्या टप्प्यात लाभ..

मराठवाड्यातील पाण्याचे असमान वितरण लक्षात घेता अतिरिक्त पाणीसाठा असलेल्या धरणांमधून दुष्काळी भागातील धरणांपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पोहोचविणे हा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी दुहेरी प्रवाहाची व्यवस्था विकसित करण्यात येणार आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव या चार जिल्ह्यांचा समावेश असून जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उजनी, निम्न तेरणा आणि निम्न मनार ही धरणे परस्परांना जोडण्यात येणार आहेत. सुमारे ३ हजार ९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य व दुय्यम पाइपलाइन आणि १५ जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा सुमारे एक कोटी नागरिकांना थेट लाभ होणार आहे.

२० हजार कोटींच्या कर्जसहाय्याबाबत जायकाचा सकारात्मक प्रतिसाद..

संपूर्ण आठ जिल्ह्यांतील वॉटर ग्रीड प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २५ हजार ५६ कोटी रुपये आहे. पहिल्या टप्प्यासाठी सुमारे २० हजार कोटी रुपयांचे कर्जसहाय्य देण्याबाबत जायकाने सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे.

लातूर आणि धाराशिव हे भूकंपप्रवण क्षेत्रात येत असल्याने प्रकल्पाच्या बांधकामात जपानचे प्रगत भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. त्यामध्ये डक्टाईल आयर्न पाइप्स, आधुनिक पंपिंग यंत्रणा आणि SCADA प्रणालीचा समावेश असेल. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटी, शेंद्रा-बिडकीन आणि वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास या प्रकल्पामुळे मदत होणार आहे.

ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) क्षेत्रात महाराष्ट्राला जागतिक स्तरावर पुढे नेण्यासाठी जपानी कंपन्या आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज (IICT) यांच्या सहकार्याने उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत फेब्रुवारीमध्ये मुंबईत 'मांगा कारवान' आयोजित करण्यात येणार असून, या उपक्रमाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वागत केले.

२०२९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन..

■ मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणे आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची प्रक्रिया जायकाच्या सहकार्याने तातडीने पूर्ण करण्यात येणार आहे. २०२९ पर्यंत प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले. महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधा विकासासाठी तसेच पाणी, वाहतूक, पर्यावरण आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रकल्पांसाठी राज्य शासन जपानसोबतचे सहकार्य अधिक दृढ करणार असून, सर्व प्रकल्पांना शासनाकडून आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन नैनुटिया, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव अमगोथू नाईक, 'मित्रा'चे विभाग प्रमुख डॉ. संजय बेलसरे तसेच भारतातील जपानच्या महावाणिज्यदूत हितोमी सातो, भारतीय कार्यालयातील जपानचे वाणिज्यदूत केन्जी ताकागी, जायका इंडिया कार्यालयाच्या मुख्य प्रतिनिधी ताकुरो ताकेउची आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या केज तालुका कार्यकारिणीची घोषणा

तालुकाध्यक्ष पदी चंद्रकांत पाटील, सचिवपदी दीपक साखरे यांची निवड

केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केज तालुका कार्यकारिणी ची बैठक शुक्रवार दि.६ नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा प्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभवजी स्वामी यांच्या आदेशा नुसार आयोजित या बैठकीत केज तालुका कार्यकारिणीची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणी मध्ये तालुकाध्यक्षपदी चंद्रकांत पाटील, तालुका सचिवपदी दीपक साखरे सर, उपाध्यक्षपदी कृष्णा केदार व संदीप घुगे, कोषाध्यक्षपदी हिराचंद काळे,सहसचिवपदी कमलाकर सोनवणे यांची निवड करण्यात आली.तसेच सदस्य पदी बाबासाहेब शिरसाट,सार्थक पाटील व अविनाश साबळे,वैजनाथ काळे, गोरक्षनाथ रहाणे प्रसिद्धीप्रमुख पदी अमोल शेटे,तर कायदेशीर सल्लागार पदी ॲड.एस.बी.मस्के यांची निवड करण्यात आली. बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे उपस्थित पत्रकार बांधवांनी अभिनंदन केले.तसेच पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी, पत्रकारांच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि पत्रकारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्या साठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड, गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार,शेकापचे राज्य समिती सर चिटणीस भाई मोहन गुंड,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्यासह अन्य मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

कलाकारांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारा मान्सून शो कौतुकास्पद

मनीषाताई टोपे यांच्याकडून ३३व्या राज्यस्तरीय कला प्रदर्शनाचे कौतुक विद्यार्थ्यांसह कलारसिकांची मोठी गर्दी

जालना प्रतिनिधी

कलाकारांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासोबतच त्यांच्या सर्जनशीलतेला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा मान्सून शो–२०२६ हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार श्रीमती मनीषाताई टोपे यांनी काढले.

यशवंतराव चव्हाण सेंटर जालना अजिंठा चित्रकला महाविद्यालय आणि रोटरी क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३३व्या राज्यस्तरीय कला प्रदर्शनाला मनीषाताई टोपे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी प्रदर्शनातील विविध कलाकृतींची पाहणी करून कलाकारांच्या कल्पकतेचे आणि कलात्मक अभिव्यक्तीचे विशेष कौतुक केले. जालन्यासारख्या शहरात राज्यस्तरीय कला प्रदर्शनाचे आयोजन होत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांसह नागरिक आणि कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विविध माध्यमांतून साकारलेल्या चित्रांमधील कल्पकता,रंगसंगती आणि कलाविष्काराने उपस्थितांना अक्षरश मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनीही चित्रकलेच्या विविध पैलूंची



माहिती घेत कलाकारांच्या कलाकृतींचा मनमुराद आनंद लुटला. डॉ. दीक्षा टोपे यांनीदेखील प्रदर्शनाला भेट देत कलाकृतींची पाहणी केली आणि जालन्यात कला व संस्कृतीला प्रोत्साहन देणारे उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. कै.अंभोरे सरांच्या स्मृतींना उजाळा

या कला प्रदर्शनातील कै. अंभोरे सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेले विशेष दालन नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. या दालनाच्या माध्यमातून त्यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाला उजाळा देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे. दालनाला भेट देणाऱ्या नागरिकांकडूनही या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.अजिंक्य टोपे यांच्या आंतरराष्ट्रीय छायाचित्रांची भुरळ प्रदर्शनात अजिंक्य भैय्या टोपे यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील छायाचित्रांनीही कला रसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. छायाचित्रांमधील विषयवैविध्य,बारकावे, कलात्मकता आणि दर्जेदार सादरीकरणामुळे या छायाचित्रांना विशेष पसंती मिळत आहे. चित्रकलेसोबतच छायाचित्रकलेचा अनोखा आविष्कार अनुभवण्याची संधी या प्रदर्शनाच्या माध्यमातून रसिकांना मिळत आहे.कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाची सांस्कृतिक जाणीव समृद्ध करणारे प्रभावी माध्यम आहे. अशा प्रदर्शनांमुळे नवोदित कलाकारांना प्रेरणा प्रोत्साहन आणि आपली कला सादर करण्याची संधी मिळते. जालन्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा हा उपक्रम असल्याची भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.या प्रसंगी प्रा. डॉ. रावसाहेब ढवळे, प्रशांत महाजन, सचिन मुंदडा, प्राचार्य शहा सर, सुनील सोलाट, प्राचार्य दादासाहेब गजहंस, संजय पाटील, प्रा. सुजाता देवरे, प्रा. रणजित बायस, प्रा. डॉ. रविकिरण भुतेकर, प्रा. शंकर वैद्य, प्रा. दत्तात्रय देशमुख, प्रा. शंकर तिकांडे, प्रा. स्वप्नील रगडे यांच्यासह कला क्षेत्रातील मान्यवर, कलाकार, विद्यार्थी आणि कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळांत देगलूरमध्ये दिवाळीचा गोडवा

शिंदे साहेबांचे स्वीय सहाय्यक बालाजी पाटील खतगावकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांकडून 'आनंदाचा शिधा' वाटप..!

देगलूर प्रतिनिधी

दुष्काळाच्या संकटाने सर्वसामान्यांचे आर्थिक गणित कोलमडले असताना दिवाळीचा सण गोरगरीब कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणारा ठरावा या सामाजिक भावनेतून शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी हणेगाव व करडखेड भागात गरजू कुटुंबांना 'आनंदाचा शिधा' किटचे वाटप केले. 'भगवा खांद्यावर, शिवसैनिक बांधावर' या उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.

शिंदे शिवसेनेच्या वतीने ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या विचारधारेतून सर्कलनिहाय 'भगवा खांद्यावर, शिवसैनिक बांधावर' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने शुक्रवार दि. 6 नोव्हेंबर रोजी हणेगाव व मरखेल गणाचा कार्यक्रम सरस्वती मंगल कार्यालय हणेगाव येथे, तर करडखेड गणाचा कार्यक्रम महादेव मंदिर, करडखेड येथे आयोजित करण्यात आला होता. सदर उपक्रम उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांचे स्वीय सहाय्यक बालाजी पाटील खतगावकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून ग्रामीण भागातील कष्टकरी आणि हातावर पोट असणाऱ्या कुटुंबांसमोरही उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत दिवाळीसारख्या सणाच्या काळात गोरगरीब कुटुंबांनाही सणाचा आनंद घेता यावा या उद्देशाने शिवसैनिकांकडून आनंदाचा शिधा किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या विविध आवश्यक साहित्याचा समावेश होता. यावेळी जिल्हाप्रमुख उमेश मुंडे , उपजिल्हाप्रमुख व्यंकटराव पाटील खतगावकर ,युवा सेना जिल्हाप्रमुख नामदेव पाटील देगावकर , तालुकाप्रमुख व्यंकट धुमाळे , व्यंकट पुरमवार ,वकील कापसे , मिलिंद काळगावकर,ज्योती ताई वरखिडे ,महिला तालुकाप्रमुख सौ संगीताताई कदम ,महिला शहरप्रमुख अनुजा ताई जाधव यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

अंबाजोगाई न. प.च्या नवीन इमारतीसाठी ५ कोटींचा निधी मंजूर

अंबाजोगाई :प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने पहिल्या टप्प्यात ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. 'नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान' या योजनेअंतर्गत या निधीला ६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या नव्या इमारतीमुळे नागरिकांची मोठी सोय होणार असून, आ. नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

सध्याची इमारत अत्यंत गैरसोयीची

सध्याची नगर परिषदेची इमारत नागरिकांसाठी



नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

अत्यंत गैरसोयीची ठरत आहे. याच इमारतीत व्यापारी संकुल असल्याने तिथे नेहमी प्रचंड गर्दी असते, ज्यामुळे नागरिकांना पार्किंगची मोठी अडचण भेडसावते. पालिकेत कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना गाड्यांच्या गर्दीतून वाट काढत कार्यालयात जावे लागते. तसेच, कार्यालय पहिल्या मजल्यावर असल्याने विशेषतः वृद्ध व्यक्ती आणि दिव्यांगांना नाहक त्रास सहन करावा लागतो. सध्याच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी अपुरी जागा असून काही विभागांना तर जागाच उपलब्ध नाही. त्यामुळे कर्मचारी दाटीवाटीने बसतात आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठीही पुरेशी जागा मिळत नाही. या सर्व वाढत्या गैरसोयी लक्षात घेऊन नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी नवीन प्रशासकीय इमारतीसाठी आमदार नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या सततच्या प्रयत्नांची दखल घेत शासनाने इमारतीच्या पहिल्या टप्प्यासाठी ५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. या संपूर्ण प्रकल्पाचा एकूण खर्च अंदाजे १० कोटी रुपये अपेक्षित आहे. राज्य शासनाने मंजूर केलेल्या या प्रकल्पाचा १०० टक्के हिस्सा राज्य शासनाचाच राहणार असल्याचे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, या विकासकामाची कार्यान्वयन यंत्रणा म्हणून अंबाजोगाई नगर परिषद काम पाहणार आहे.

चवीचा रुबाब तोच, स्वच्छतेचा नवा विश्वास..!

'मामा काठियावाडी' हॉटेलची पुन्हा दिमाखात ग्राहक सेवेत एन्ट्री.!

बीड प्रतिनिधी

खवय्यांच्या पसंतीला उतरलेले आणि आपल्या खाद्यपदार्थांच्या चवीमुळे ओळख निर्माण केलेले 'मामा काठियावाडी' हॉटेल आता नव्या उत्साहात पुन्हा ग्राहकांच्या सेवेत दाखल झाले आहे. काही दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) तपासणीत आढळलेल्या त्रुटींमुळे हॉटेलचा परवाना निलंबित करण्यात आला होता. मात्र, या कारवाईनंतर हॉटेल प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्व त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत.

कचराकुंडीला झाकण नसणे, कामगारांच्या डोक्यावर कॅप नसणे, धुरामुळे भिंती काळसर होणे तसेच पिण्याच्या पाण्याचा अहवाल उपलब्ध नसणे अशा मुद्द्यांवर प्रशासनाने आक्षेप घेतला होता. या सर्व बाबींची पूर्तता करून स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यासाठी हॉटेलमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात आल्या आहेत.

चुका सुधारून पुन्हा नव्या विश्वासाने सुरुवात.!

व्यवसायात ग्राहकांचा विश्वास हीच खरी संपत्ती असते, याची जाणीव ठेवत मामा काठियावाडी हॉटेल प्रशासनाने आवश्यक सुधारणा करण्यावर भर दिला आहे. ग्राहकांना स्वच्छ वातावरणात, सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आता अधिक जबाबदारीने केला जाणार आहे.

सर्व त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर ३ नोव्हेंबर २०२६ पासून मामा काठियावाडी हॉटेल पुन्हा एकदा ग्राहकांच्या सेवेत सुरू झाले आहे.

FDA च्या कारवाईनंतर सर्व त्रुटींवर मात, स्वच्छता, गुणवत्ता आणि ग्राहकांच्या आरोग्याला प्राधान्य देत हॉटेल पुन्हा सुरू..!

हॉटेलमध्ये येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाचे समाधान, आरोग्य आणि स्वच्छतेची काळजी घेणे हेच आपले प्राधान्य असल्याचा विश्वास हॉटेल प्रशासनाने व्यक्त केला आहे. पूर्वीची खाद्यपदार्थांची ओळख कायम ठेवत स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या बाबतीत अधिक सजग राहण्याचा निर्धारही करण्यात आला आहे.

कारवाईतून धडा, सुधारणांतून नवा विश्वास आणि ग्राहकसेवेतून पुन्हा एकदा नवी सुरुवात.!

मामा काठियावाडी हॉटेलच्या या पुनरागमनामुळे खवय्यांना पुन्हा आपल्या आवडत्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी मिळणार आहे. चला तर मग, मामा काठियावाडी हॉटेलला भेट देऊया आणि चविष्ट खाद्यपदार्थांचा आनंद घेऊया. मामा काठियावाडी ग्राहकांचा विश्वास जपण्याच्या दिशेने नवी सुरुवात.!



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड – ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).